Publication: Punyanagari
Date: 31/8/2019
Page: 1
Column:

पुण्य नगरी

शनिवार
३१ ऑगस्ट २०१९
मुंबई

अदानीकडून गणेश मंडळांना सवलतीचे दर

मुंबई : अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबईने गणेशोत्सव मंडळांसाठी सवलतीच्या दरात वीज उपलब्ध करून दिली आहे. अर्ज कंपनीला मिळाल्यानंतर फक्त तीन दिवसांत ही जोडणी सुरू केली जाईल. अदानीच्या प्रवक्त्यांनी शहरातील २५०० हून अधिक मंडपांना वीजजोडणी पुरवण्यासाठी नियोजन केल्याचे स्पष्ट केले आहे. मंडपाजवळ सर्व परिस्थिती सुयोग्य असल्यास आणि सर्व नियमांचे पालन केल्यास अर्ज मिळाल्यानंतर तीन दिवसांच्या आत वीजजोडणी पुरवली जाईल, असे सांगत मंडपांमध्ये अधिकृत जोडणी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ६६६.ब्लि ी ू३१ू३८. ू्ले या वेबसाईटला भेट देऊन मंडळांना ऑनलाइन अर्ज करता येईल. तसेच, मुंबई उपनगरांत सर्वत्र पसरलेल्या एईएमएल डिव्हिजनल कस्टमर केअर सेंटर्सना भेट देऊनही अर्ज करता येईल, असेही सांगण्यात आले आहे.